**उपविधी सल्लागार (गट-अ) या संवर्गात**
**तात्पुरत्या व स्थानापन्न स्वरुपात**
**पदोन्नत्या/नेमणूका/ पदस्थापना**

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे [ पूर्व ], मुंबई ४०००५१**
**आदेश क्र.प्राधि/पदोन्नती/२०१९/2909 /प्र.७**
**दिनांक :- 30 OCT 2019**

**आ दे श**

प्रशासकीय हित व कामाची निकड लक्षात घेऊन, **सहाय्यक विधी सल्लागार (गट-ब)** संवर्गातील खालील नमुद अधिका-यांस खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून **उपविधी सल्लागार (गट-अ)** या संवर्गात रु.१५६००-३९१०० या वेतन बँडमधील ग्रेड पे रु.५४००/- या वेतन संरचनेत एतदर्थ, पूर्णपणे तात्पुरत्या आणि स्थानापन्न स्वरुपात कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासून पदोन्नती देण्यात येत असून, पदोन्नतीनंतर त्यांची पदस्थापना त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासून करण्यांत येत आहे.

| अ. क्र. | अधिका-यांचे नाव | सध्याचे कार्यालय | पदोन्नती नंतरचे कार्यालय | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.ए.एन.खोब्रागडे | प्राधिकरण | विधी सल्लागार/प्रा. | श्री पी बी वीर यांचे पदोन्नतीने रिक्त पदी |

२/- सदरहू, अधिकाऱ्यांची तात्पुरत्या पध्दतीनुसार पदोन्नतीने केलेली नेमणूक विधी संवर्गाच्या सेवा प्रवेश नियमाच्या अधीन राहून ज्येष्ठतेनुसार तात्पुरत्या एतदर्थ व स्थानापन्न स्वरुपाची असल्याने त्यांचा या संवर्गातील कायम पदावर कोणताही हक्क/धारणाधिकार राहणार नाही, या अटीवर करण्यात येत आहे.

३/- प्रशासकीय निकड व कार्यभाराच्या आवश्यकतेनुसार पदांच्या संख्येत बदल झाल्यास सदर तात्पुरती व स्थानापन्न पदोन्नती रद्द होऊन सेवा ज्येष्ठतेनुसार कनिष्ठतम संबधित कर्मचारी पदावनतीस पात्र ठरतील.

४/- संबधित पदोन्नत पदधारकास पदोन्नतीनंतर अनुज्ञेय वेतनाबरोबर महागाई भत्ता व अन्य भत्ते नियमानुसार अनुज्ञेय राहतील.

५/- शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्र.वेतन-१०८२/सीआर-११०० [एक ]/ सेवा-३, दिनांक ६/११/१९८४ नुसार संबंधित पदोन्नत पदधारकाने आपल्या वेतन निश्चितीचा विकल्प पदोन्नतीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत द्यावयाचा आहे. अन्यथा त्यांची वेतन निश्चिती सरळ महाराष्ट्र नागरी सेवा [वेतन ] नियम १९८१ च्या नियम ११ ची दिनांक ०३.०७.१९९३ अन्वयेची सुधारणा अर्थात महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) (दुसरी सुधारणा) नियम १९९३ नियम ११ (१) मधील तरतुदीनुसार करण्यांत येईल.

६/- संबधित पदोन्नत पदधारकास सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यात आलेला असल्यास, त्यांची वेतननिश्चिती पुन्हा करण्यात येऊ नये. याबाबत त्यांच्या सेवापुस्तकातील नोंदी पाहून पुढील कार्यवाही करण्यात यावी.

७/- हे आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून सात दिवसाच्या आंत पदोन्नत पदधारक यांनी नवीन नेमणूकीच्या ठिकाणी रुजू व्हावयाचे आहे. पदस्थापनेच्या संदर्भात केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही. त्यांच्या सक्षम अधिका-यांनी स्थानिक पर्यायी व्यवस्था करुन त्यांना तात्काळ कार्यमुक्त करावे.

८/- पदोन्नत पदधारक हे पदोन्नतीनुसार पदस्थापनेच्या जागी तात्काळ रुजू न झाल्यास, त्यांना पदोन्नतीमध्ये स्वारस्य नाही, असे गृहीत धरण्यात येईल. तसेच याबाबत शासन निर्णय दि.१२.०९.२०१६ मधील तरतूदीनुसार त्यांची पदोन्नती रद्द करण्यात येईल व पदोन्नतीसाठी पुढील २ वर्षे त्यांचे नावाचा विचार करण्यात येणार नाही. तिसऱ्या वर्षी त्यांचे नाव विभागीय पदोन्नती समितीसमक्ष सादर करण्यात येईल.

९/- उपरोक्त अधिकाऱ्याची कनिष्ठ संवर्गातील सेवाज्येष्ठता वरीष्ठ संवर्गात अबाधित राहील.

१०/- शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२९.१२.२०१७ रोजीच्या पत्रान्वये कळविल्याप्रमाणे पदोन्नती कोट्यातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे सेवा ज्येष्ठतेने मा. सर्वोच्च न्यायालयातील विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६ / २०१७ च्या निर्णयाच्या अधीन राहून भरण्यात येत आहेत. तसे करताना निम्न संवर्गातील मागासवर्गीय अधिकारी / कर्मचारी यांना पदोन्नतीपुर्वी ते दिनांक २५.०५.२००४ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार आरक्षणाचा लाभ मिळवून सेवा ज्येष्ठता यादीत वरच्या स्थानावर आले नाहीत याची खात्री करून पदोन्नती देण्यात येत आहे. पदोन्नत पदधारकाकडून या अटीची पुर्तता होत नसल्याचे आढळुन आल्यास पदोन्नती आदेश रद्द करण्यात येतील.

**११/- उपरोक्त अधिकाऱ्यांनी दि.३१/३/२०१९ रोजीचे विहित विवरणपत्रात मत्ता व दायित्वे भरुन दिल्याची खात्री करुन घेतल्याखेरीज संबंधित अधिकाऱ्यांना पदोन्नतीचे आदेश हस्तांतरीत करण्यात येऊ नयेत. तसेच आदेश हस्तांतरीत करण्यापूर्वी सदर अधिकाऱ्यांनी मत्ता व दायित्वे सादर केल्याचा अहवाल प्राधिकरणास सादर करावा.**

सदरहू आदेश तात्काळ अंमलात येतील.

**मा. उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्रा.**
**यांचे मान्यतेने.**

**(प्रसाद उकर्डे)**
**सचिव / प्राधिकरण**

**प्रति,**
(श्री ए. एन. खोब्रागडे, सहाय्यक विधी सल्लागार/प्रा.)
**(विधी सल्लागार/प्रा. यांचेमार्फत)**

**<u>प्रत सस्नेह अग्रेषित :</u>**

१ मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/प्रा.
२ मुख्य अधिकारी / मुं.गृ.नि.व क्षे.वि.मंडळ/मुं.इ.दु.व पु.मंडळ
३ मुख्य अभियंता/प्रा. (१/२/३)
४ वित्त नियंत्रक/प्रा.

५ उपमुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा.
६ मुख्य वास्तुशास्त्रज्ञ/प्रा.
७ मुख्य अधिकारी मुं.झो.सु.मं./कोंकण/पुणे/नाशिक/नागपूर/औरंगाबाद/अमरावती मंडळ

**प्रत,**

१. मुख्य लेखाधिकारी/मुं.इ.दु. व पु. मंडळ
२. लेखाधिकारा-१/प्रा.
३. प्रशासकीय अधिकारी-१, २/प्रा.

**प्रत माहितीसाठी :-**

मा. उपाध्यक्ष/प्रा. यांचे स्वीय सहाय्यक
प्रत - अध्यक्ष ,महाराष्ट्र गृहनिर्माण कर्मचारी संघटना
प्रत - प्रधान कार्यवाह ,मागासवर्गीय कर्मचारी संघटना
प्रत - अध्यक्ष, ग्रॅज्युएट इंजिनिअर्स असोसिएशन ऑफ म्हाडा, मुंबई.
प्रत - प्रशा-६/८/९/१०/११/१२/१३/१५/प्रा.